


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : १९, पाने : ०६, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.०३ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056




## मराठ्यांच्या मागण्या मान्य, जरांगेंचं उपोषण मागे

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, मुंबई :** मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज अखेर उपोषण मागे घेतलं आहे. जरांगे यांनी उपोषण मागे घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली. मनोज जरांगे यांचं आदोलन त्यांनी मागे घेतलं आहे. खरं म्हणजे हैदराबाद लागू करण्याकरता आमची सुरुवातीपासून तयारी होती. पण त्यातील महत्त्वाचा विषय होता की, मनोज जरांगे यांची सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्यावे, अशी मागणी होती. त्यामध्ये कायदेशीर अडचणी होत्या. हायकोर्टाचे आणि सुप्रीम कोर्टाचे निर्णय पाहता अशाप्रकारे सरसकट करणं शक्य नव्हतं, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

विशेषत: आपण लक्षात घेतलं पाहिजे की, ही वस्तुस्थिती त्यांच्याही लक्षात आणून देण्यात आली. मंत्रिमंडळ उपसमितीच्या टीमने त्यांच्याही लक्षात आणून दिलं. आपल्या कायद्याप्रमाणे आणि देशाच्या संविधानाप्रमाणे आरक्षण हे समुहाला नसतं तर व्यक्तीला असतं. त्या व्यक्तीने ते क्लेम करायचं असतं. म्हणूनच अशाप्रकारे सरसकट करता येणार नाही. ते कायद्याच्या पातळीवर टिकणार नाही. त्यांनीदेखील काल ती भूमिका समजून घेतली आणि स्वीकारली, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

त्यांनी सांगितलं की, कायद्यात सरसकट बसत नसेल तर सरसकट करु नका. त्यातून हा स्टेलमेंट मागे झाला. पुन्हा त्याबाबत मंत्रिमंडळ उपसमितीने चर्चा केल्या. जीआर काढला. त्यामध्ये जे बदल हवे होते ते केले. तो जीआरदेखील जाहीर झाला आहे. त्यासोबतच इतर मागण्या होत्या. त्या सगळ्या मागण्या मंत्रिमंडळ उपसमितीने मान्य केल्या आहेत, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मला पहिल्यांदा मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष आणि समितीमधील मंत्र्यांचं अभिनंदन करायचं आहे. त्यांनी सातत्याने बैठका घेऊन चर्चा करुन मार्ग काढला आहे. हा मार्ग निघाल्यामुळे मराठवाड्यात राहणाऱ्या आमच्या मराठा समाजाच्या लोकांना, ह्यांना कधीकाळी रक्तनात्यातील लोकांचा कुणबी म्हणून उल्लेख असेल तर त्यांना कुणबी जात प्रमाणपत्र मिळणार आहे. हैदराबाद गॅझेटियरमुळे ते सोपं होणार आहे. फॅमिली ट्री इस्टॅब्लिश करुन आरक्षण दिलं जाणार आहे. ज्यांना अशाप्रकारचे पुरावे मिळेल ते सगळ्यांना आरक्षण मिळेल, असं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

हा प्रश्न सर्वाधिक मराठवाड्यासाठी महत्त्वाचा होता. कारण मराठवाड्यात रेकॉर्ड नाहीयत. आम्ही एक संविधानिक तोडगा काढू शकलो आहोत. हे आरक्षण कोर्टातही टिकेल. मी मंत्रिमंडळ उपसमितीच्या कार्यावर समाधानी आहोत. त्यांनी उत्तम काम केलं आहे. मी त्यांचं अभिनंदन करतो. या सगळ्या दरम्यान मुंबईकरांना त्रास सहन करावा लागला. त्या निमित्ताने मी दिलगिरी व्यक्त करतो, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.



**‘अतिशय चांगला निर्णय’**

ओबीसी समाजाला भीती होती की, सरसकट सगळे अशाप्रकारे आरक्षण घेतील आणि ज्यांच्याकडे पुरावा नाही ते देखील आरक्षण घेतील. तसेच इतरही समाजाचे ज्यांना आरक्षण नाही ते देखील आरक्षण घेतील. तशाप्रकारे आता होणार नाही. ज्यांचा खरा क्लेम आहे, पण कागदपत्रांच्या अभावी त्यांना तो क्लेम मिळत नव्हता अशा मराठा समाजाच्या नागरिकांना आता आरक्षण मिळणार आहे. त्यामुळे मराठा समाजाकरता अतिशय चांगला निर्णय झाला, अशी प्रतिक्रिया फडणवीसांनी दिली.

## दारू पार्टीचा शेवट मृत्यू !

### नदीत पोहायला गेलेल्या तरुणाचा मृतदेह मुंढव्यात सापडला

**अक्षराज : प्रणिल कुसळे**

**दि.०२, पुणे :** मुंढवा परिसरात धक्कादायक घटना समोर आली आहे. तडीवाला रोड परिसरातील रहिवासी राहुल हावडे (वय अंदाजे ३०) याचा मृतदेह मुळामुठा नदीत आढळून आला.

मिळालेल्या माहितीनुसार, ३० ऑगस्ट रोजी राहुल हावडे हा तडीवाला रोड परिसरातूनच आपल्या मित्रांसोबत नायडू हॉस्पिटलजवळ दारू पार्टीसाठी जमला होता. दुपारनंतर ते सर्वजण हॉस्पिटलच्या शेजारील नदीपात्रालगत बसून मद्यपान करत होते. त्यावेळी राहुलने अचानक मी पोहायला जातो असे सांगून थेट नदीत उडी घेतली. सुरुवातीला तो सहज पोहत आहे असे मित्रांना वाटले, मात्र काही वेळानंतर तो परत वर आला नाही.

यावेळी नदीकाठी सामाजिक आणि दलित चळवळीशी संबंधित काही कार्यकर्ते देखील उपस्थित होते. त्यांनीदेखील घटनास्थळावरून शोध घेण्याचा प्रयत्न केला, पण काहीच निष्पन्न झाले नाही. कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, राहुल मद्यधुंद अवस्थेत होता आणि त्याला पोहण्याचा योग्य अनुभव नसल्यामुळे ही दुर्घटना घडल्याची शक्यता आहे. उपस्थित सर्वांच्या डोळ्यांसमोर घडलेल्या या प्रकारामुळे ते देखील हळहळ व्यक्त करताना दिसले.

मित्रांनी पोलिसांना तातडीने माहिती दिल्यानंतर दोन दिवस सतत शोधमोहीम सुरू होती. अखेर १ सप्टेंबर रोजी मुंढवा परिसरात त्याचा मृतदेह पाण्यात तरंगताना आढळला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांसह मुंढवा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

प्राथमिक तपासात हा अपघाती बुडाल्याचा प्रकार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

या घटनेमुळे तडीवाला रोड परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून अचानक घडलेल्या या दुर्घटनेने परिसरातील नागरिकांमध्ये तसेच उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## ‘राष्ट्रीय अंत्योदय काँग्रेस’ पक्ष आणि... ‘सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया’ पक्षाची नोंदणी रद्द ?

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०२, ठाणे :** केंद्रीय निवडणूक आयोगाने ’राष्ट्रीय अंत्योदय काँग्रेस’ आणि ’सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया’ या राजकीय पक्षांना निवडणूक आयोगाने ’पक्षाची नोंदणी रद्द का करू नये?’ अशी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

गेल्या सहा वर्षांपासून, म्हणजे २०१९ पासून या पक्षांनी कोणतीही निवडणूक लढवलेली नाही. त्यामुळे, लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ च्या कलम २९अ नुसार या पक्षाने राजकीय पक्षासारखे काम करणे थांबवले आहे, असे आयोगाला वाटते. याच कारणामुळे आयोगाने पक्षाची नोंदणी रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, कारवाई करण्यापूर्वी पक्षाला आपली बाजू मांडण्याची संधी दिली आहे. निवडणूक आयोगाच्या रेकॉर्डनुसार, ’राष्ट्रीय अंत्योदय काँग्रेस’ पक्षाची तसेच ’सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया’ या पक्षाची स्थापना निवडणुकीत भाग घेण्यासाठी झाली होती. मात्र, २०१९ पासून या पक्षांनी लोकसभा, राज्य विधानसभा किंवा कोणत्याही पोटनिवडणुकीत एकही उमेदवार उभा केलेला नाही. यामुळे, हे पक्ष आता कलम २९अ नुसार राजकीय पक्षाच्या निकषांचे पालन करत नाही, असे आयोगाचे म्हणणे आहे.

या नोटिशीला उत्तर देण्यासाठी पक्षांना ४ सप्टेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. पक्षाला लेखी स्पष्टीकरण, संबंधित कागदपत्रे आणि अध्यक्षांचे किंवा सरचिटणीसांचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. या प्रकरणी ११ सप्टेंबर २०२५ रोजी मुंबईतील मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या दालनात सुनावणी होणार आहे. या सुनावणीला पक्षाच्या अध्यक्षांनी, सरचिटणीसांनी किंवा पक्षप्रमुखांनी हजर राहणे आवश्यक आहे. जर पक्षाने ठरलेल्या मुदतीत उत्तर दिले नाही किंवा सुनावणीला उपस्थित राहिले नाही, तर योग्य ती कारवाई केली जाईल, अशी नोटीस निवडणूक आयोगाचे उप सचिव तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी मनोहर पारकर यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आली आहे.

## विवाहाच्या आमिषाने पुण्यातील हॉटेलमध्ये अत्याचार

**दि.०२, पुणे :** मॅट्रिमोनी वेबसाइटवर झालेल्या ओळखीतून तरुणीला लग्नाचे आमिष दाखवलं आणि तिला हॉटेलमध्ये बोलावून बलात्कार केला. हा प्रकार इतक्यावरच न थांबता फोटो-व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत तिच्याकडून दोन लाख रुपये उकळण्यात आले. पुणे जिल्ह्यात ही धक्कादायक घटना घडल्याचे उघडकीस आले आहे. तरुणीचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन तिला मानसिक त्रास दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी खराडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अमित गंगाधर शेंडगे, रा. पारगाव, जि. सोलापूर, असे गुन्हा दाखल झालेल्या तरुणाचे नाव असून, पीडित तरुणीने खराडी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

## शब्दात फेरफार, सरकारनं फसवलंय.. मला माफ करा...

### जीआरसंबंधी वकिलाचा धक्कादायक खुलासा !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, मुंबई :** मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील आणि त्यातील सदस्यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेत त्यांच्या मागण्यांसंबंधी काही मागण्या तात्काळ मान्य करत जीआर सुपूर्द केला. जरांगे पाटील यांनी तुमच्यामुळे जिंकलो असे जाहीर केले. त्यानंतर आझाद मैदान परिसरात जल्लोष साजरा केला. पण तेथे असलेल्या वकील योगेश केदार यांनी जीआरवर आक्षेप घेत सरकारनं फसवलं आहे अशी भूमिका घेतली आहे. त्यांनी सोशल मीडियावर प्लॅटफॉर्म फेसबूकवर व्हिडिओ पोस्ट करत जीआरसंबंधी भूमिका मांडली.



**दादांची वकिलांनी दिशाभूल केली**

मनोज दादांसारख्या प्रामाणिक नेतृत्वानं मला तो जीआर तपासून घेण्याची जबाबदारी दिली होती. याच्यात काही उणिवा असतील तर सांगा. तिथेच आम्ही तपासला जीआरमधील शब्दांत बऱ्यापैकी फेरफार केला गेलेला आहे. त्यात संभ्रम ठेवला गेला आहे. जेणेकरून येणाऱ्या हजारो मराठ्यांना, अनेक पिढ्यांना त्याचा त्रास होणार आहे. मनोजदादांना अनेक वकिलांनी घेरले आणि त्यांची दिशाभूल केली आहे. माझं असं स्पष्ट म्हणणं आहे की, सरकारनं आपल्याला फसवलेलं आहे.

**शिंदे समितीनं ते आधीच शोधलंय...**

मनोजदादांनी आजही संयम बाळगावा, आम्ही त्यांच्या नेतृत्त्वात लढण्यास आजही तयार आहोत. ते आमच्यासाठी दैवत आहेत. पण या जीआर वाचला तर आपल्याला त्यातील अनेक उणिवा लक्षात येतील. या जीआरचा कोणाला लाभ होऊ शकतो. ज्यांच्या नोंदी कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा असतील अशा लोकांना त्याचा लाभ होईल. मग यात वेगळं काय आहे. शिंदे समितीने ते आधीच शोधलं आहे. अजून सोप्या भाषेत सांगतो. ज्या ज्या लोकांना शिंदे समितीच्या माध्यमातून नोंदी मिळालेल्या आहेत. त्यांनाच याचा फायदा होणार आहे.

**सत्य सांगत असताना मला दूर केलं...**

ज्या गावांमध्ये मराठा समाजाला नोंदच सापडली नाही. त्यांना याचा काही लाभ होणार नाही. आम्ही असे समजत होतो की, हैदराबाद गॅझेटियर लागू करणं म्हणजे तेथील सर्व मराठा कुणबी आहेत. किंवा मराठा कुणबी आहेत किंवा कुणबी मराठा आहेत.

असे त्यात कुठेही स्पष्टता नाही. हैदराबाद गॅझेटियरच्याबाबतीत अनेक कायदे तज्ज्ञांनी माझ्याशी चर्चा केलेली आहे. या जीआरला सुद्धा आव्हान देता येईल. यातून मराठ्यांच्या पदरात काही मिळालेलं नाही. दादांना मी हे सत्य सांगत असताना त्यांच्याजवळच्या लोकांनी मला दूर केलं. नंतर दादांनीही मला थोडसं दूर केलं. पण त्यांनी माझ्यावर जबाबदारी दिलेली असेल म्हणून एक छत्रपतींचा मावळा म्हणून सत्य सांगण्याचं धाडस मी दादांना तिथे केले. भलेही माझी गोष्ट आता त्यांना मान्य झाली नाही. पण त्यांना लक्षात आलेलं आहे की योगेश केदार म्हणतोय म्हणजे त्यात काहीतरी खरं आहे. आता मनोजदादांची प्रकृती आमच्यासाठी फार महत्त्वाची होती. म्हणून समाजाला समजून घ्यावं लागणार आहे.

**संधी सरकारनं हिरावून घेतली**

परत एकदा लढ्याची तयारी ठेवावी लागणार आहे. मनोजदादांसारखा हिरा आपल्याला गमावून चालायचा नाही. त्या नेतृत्त्वासारखा प्रामाणिक नेता नाही असे माझे मत आहे. फक्त काही लोक मिसगाईड करतात. शेकडो लोकांच्या त्यागातून आणि करोडो रुपये खर्च करुन मुंबईत ठाण मांडला होता. सरकार घाबरलं होते. अशा स्थितीत जिथे जिथे मराठा शब्द आहे. तिथे तिथे दाखला देण्याची संधी होती. ती सरकारने हिरावून घेतली. आज मला मराठा समाजाने मला माफ करावं. माझा आवाज कमी पडला. आपण सरकारला सत्य सांगू.

## कोलकाताला जाणाऱ्या विमानाचं नागपुरात इमरजन्सी लँडिंग, वाचले २७२ प्रवाशांचे जीव

**दि.०२, नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानळावरून कोलकाताच्या दिशेने उडालेल्या विमानाला मंगळवारी सकाळी एक पक्षी धडकला. ही धडक इतकी जोरात होती की विमानाचा पुढील भाग काही प्रमाणात चपकला. कुठलीही अनुचित घटना घडू नये या काळजीपोटी वैमानिकाने विमान परत फिरविले आणि येथील विमानतळावर आपात्कालीन लँडिंग केले. वैमानिकाच्या प्रसंगावधानामुळे २७२ प्रवाशांचा जीव वाचला असून विमानेला धडक देणारा पक्षी मोठ्या आकारातील घार असावी, असे सुत्रांचे म्हणणे आहे.

विमानांना पक्षी धडकण्याच्या घटना देशभर घडत असतात. यातून काही ठिकाणी मोठे अपघातदेखील झाले आहेत. या पार्श्वभूमीवर मंगळवारी सकाळी ७.१५ वाजतादरम्यान झालेल्या या घटनेकडे गांभीर्याने पाहण्यात येत आहे. जून महिन्यात एअर इंडियाच्या अहमदाबाद-लंडन विमानाला अपघात झाल्यानंतर अनेकांच्या मनात विमानप्रवासाबाबत धडकी भरलेली आहे. अशात मंगळवारी सकाळी इंडिगो एअरलाइन्सच्या फ्लाइट क्रमांक ६ ई ८१२ या नागपूर-कोलकाता विमानाला पक्ष्याने धडक दिली. निर्धारित वेळापत्रकानुसार विमान येथून सकाळी ७.०५ वाजता उडाले. सुत्रांच्या माहितीनुसार, विमानाने टेक ऑफ घेतल्यानंतर रनवेपासून अर्धा ते एक किमी अंतरावर असलेल्या जयताळ्याजवळ पक्षी धडकला. ही घटना घडताच वैमानिकाने येथील एअर ट्राफिक कंट्रोलरशी संपर्क साधला. त्यानुसार आठ ते दहा किमी अंतरावरून विमान परत आले आणि आपात्कालीन लँडिंग करण्यात आले. वेळेत लँडिंग झाल्यामुळे २७२ प्रवाशांचा जीव वाचला.




## कोकणवासी म्हणा, पण...

कोकणातील मुंबईकरांना ‘चाकरमानी’ नको, ‘कोकणवासी’ म्हणा, असे फर्मान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकतेच परिपत्रकाद्वारे काढले. काही महिन्यांपूर्वीच अजित पवार यांनी मुंबई–गोवा महामार्गाची बहुचर्चित दुरवस्था दूर करण्याचे शिवधनुष्य शिरावर घेतले. गेल्या काही महिन्यांत अनेकांना असा कोकणवासीविषयी उमाळा येतो आहे का, असा प्रश्न कोकणसुपुत्रांना पडला.

रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाचा वाद खदखदत राहिल्याने असेल किंवा रायगड, रत्नागिरीमधून आपल्या पक्षाची बाजू अधिक चांगली करण्यास वाव आहे, हे दिसल्याने कोकणवासींच्या प्रश्नांत दादांना रस निर्माण झाला असेल? असो दर वेळी प्रत्येक गोष्टीत असे राजकीय हेतू शोधणे योग्य नाही; तेव्हा खरोखर आता एकूणच राजकीय स्तरावर सर्वांनाच कोकणभूमीच्या विकासाला लागलेली ओहोटी भरून काढण्यासाठी मनोमन मायेची भरती आली असेल, तर त्याचेही स्वागतच. कोकणवासी मात्र म्हणताहेत, आम्हाला कोणत्याही नावाने हाक मारा; पण आमच्या वर्षानुवर्षे भिजत पडलेल्या समस्या आधी सोडवा.

गणेशोत्सवाच्या काळात दर वर्षीच भाद्रपद चतुर्थीच्या आदल्या दिवशीपर्यंत लक्षावधी कोकणवासी मुंबईतून आपापल्या गावांकडे जातात. श्रीगणरायाची प्राणप्रतिष्ठा झाल्यावर भजन–दर्शनाला लोक एकमेकांकडे जातात. त्या वेळी वर्षानुवर्षे मुंबईकरांना एक प्रश्न ठरलेला असतो, तो म्हणजे ‘तुम्ही कसे आलात’ आणि ‘किती वेळ लागला’? त्यावर प्रत्येक कोकणवासी रंगवून रंगवून आपले प्रवासवर्णन करतो आणि वाहतूककोंडी, खड्डे आदी विघ्नांची नवनवी दालनेच खुली करत जातो. गोवा महामार्गाचा राष्ट्रीय क्रमांक झटकन बदलला, परंतु स्थिती पालटण्यास १५ वर्षे लागली. आजही पळस्पे ते नागोठणे, संगमेश्वर ते रत्नागिरी हे पट्टे खराबच आहेत. वडखळ ते अलिबाग, मुरुड, रोहा, हे मार्ग तर कायम खड्ड्यांमध्येच आहेत. चिपळूणसह काही पुलांची कामे अर्धवटच आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही बहुधा या मार्गापुढे हातच टेकले. महामार्गावरच्या खड्ड्यांमध्ये झिरपलेल्या पैशांबद्दल आजवर तरी कोणाला शिक्षा झाली?

कोकण रेल्वेमार्गामुळे लोकांची स्वस्तात गावी जाण्याची सोय झाली; परंतु रेल्वेमार्गावरही रखडपट्टी व तिकिटांची अनुपलब्धता या समस्या आहेत. कोकण रेल्वे महामंडळ भारतीय रेल्वेमध्ये विलीन करण्याचा प्रश्न असाच कित्येक वर्षे कागदावर पडून आहे. कोकणाच्या क्षेत्रात कोकण रेल्वेसाठी स्वतंत्र टर्मिनल नाही, दुपदरीकरण खर्चीक व वेळखाऊ आहे, त्यामुळे कोकणातून कोकणवासीयांसाठी गाड्या सोडण्यास मर्यादा येतात. तरी या वेळी रेल्वेतून मोटारी नेण्याची अभिनव सुविधा करण्यात आली, परंतु ती कोलाडहून. तिथपर्यंत मोटार नेणे हेच तर मोठे भयंकर काम! या सेवेचे तिकीट तर अधिक आहेच, शिवाय चढ–उतार व प्रवासाचा कालावधीही जास्त. पनवेलवरून अशी सोय करून दिल्यास या योजनेला अधिक प्रतिसाद मिळू शकतो. कोकणातल्या लोकांना सोयीची रत्नागिरी पॅसेंजर दादरऐवजी दिव्यापर्यंतच येते किंवा कित्येकदा काही गाड्या अचानक दिवा, पनवेलमध्ये रद्द केल्या जातात. प्रवाशांना रेल्वे इतके गृहीत कसे धरू शकते?

रेल्वे स्थानकांपासून बससुविधांचीही वानवा असते. खरे तर थोडेफार सामान नेण्याची व्यवस्था असलेल्या बसगाड्या रेल्वे स्थानकांवरून अधिक संख्येने चालवायला हव्यात. रिक्षा, व्हॅन यांचे विशिष्ट अंतरासाठीचे दर निश्चित करून द्यायला हवेत. या समस्या काही केवळ गणपती उत्सवापुरत्या नाहीत. त्यातही सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड या तिन्ही जिल्ह्यांमधल्या समस्यांचे स्वरूप वेगवेगळे आहे. या जिल्ह्यांच्या विकासाची दूरगामी दिशा व नियोजन करणेही गरजेचे आहे. नित्याच्या प्रवाशांना हे त्रास आणि दिव्य, तर मग हे जिल्हे पर्यटकांचे स्वागत तरी कसे करणार?

# महाराष्ट्रातील राजकारणात ओबीसी आरक्षणाचा बळी जाण्याची शक्यता

भारतातील आरक्षण व्यवस्था ही सामाजिक शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय घटकांना न्याय देण्यासाठी करण्यात आलेली आहे. ओबीसी आरक्षण हा त्याचाच एक महत्त्वाचा घटक असून देशाच्या राजकीय, सामाजिक व्यवस्थेवर याचा खोलवर परिणाम झालेला आहे. ओबीसी समाजाला राष्ट्रीय पातळीवरती २७% आरक्षण व महाराष्ट्र राज्यामध्ये ओबीसी समाजाला १९ टक्के आरक्षण दिलेले आहे. मराठा समाजासाठी यापूर्वी कोणतेही स्वतंत्र आरक्षण नव्हते परंतु आपणाला ही आरक्षणाची आवश्यकता आहे अशी भावना मराठी समाजामध्ये निर्माण झालेने, मराठा समाजानेही आरक्षणाची मागणी करण्यास सुरुवात केली. १९९० पासून त्यांची विविध पातळीवरती आरक्षणाची मागणी जोर धरू लागलेली . तथापि न्यायालयीन प्रक्रियेमध्ये त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी अपयश आल्याने त्यांनी ओबीसी आरक्षणाशी संबंध जोडण्याचा जोरदार प्रयत्न सुरू केला असून ओबीसी मधूनच मराठ्यांना आरक्षण मिळावे यासाठी त्यांनी आताचा मोठा संघर्ष उभा केलेला आहे.

आताची मराठा समाजाची ओबीसी मधून आरक्षणाची मागणी याचे विवेचन करण्यापूर्वी मराठी समाजाने कशाप्रकारे स्वतःची मागणी उचलून धरली व न्यायालयीन प्रक्रियेमध्ये त्यांना कशाप्रकारे अपयश आले याबाबतचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

मराठा समाजाने प्रथमतः १९९० च्या दशकापासून आरक्षणाची मागणी सुरू केली.

२०१४ मध्ये महाराष्ट्र सरकारने मराठ्यांना १६ टक्के आरक्षण जाहीर केले परंतु ते न्यायालयाने रद्द केले. २०१८ मध्ये पुन्हा महाराष्ट्र शासनाने एसईबीसी सोशियल अँड एज्युकेशनल बॅकवर्ड क्लास या नावाने आरक्षण दिले . या आरक्षणाला न्यायालयीन आव्हान देण्यात आल्यानंतर प्रकरण उच्च न्यायालय ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेले.

या न्यायालयीन प्रक्रियेमध्ये बॉम्बे हायकोर्टाने (२०१९) स्पष्ट आदेश दिले की आरक्षणाची ५०% ची मर्यादा ओलांडू नये. या वेळी मराठ्यांना दिलेले १६ टक्के आरक्षण हे कमी करून बारा टक्के शिक्षणात व १३ टक्के नोकरीत इतके मर्यादित केले. म्हणजेच हायकोर्टाने मराठा समाजाच्या मागणीला अंशतः मान्यता दिली. म्हणजेच मराठा समाज मागास असल्याचे मान्य केले.

सर्वोच्च न्यायालयाने २०२१ ला स्पष्ट केले की राज्य सरकारला स्वतंत्रपणे नवा मागास प्रवर्ग निर्माण करण्याचा अधिकार नाही. हा अधिकार केवळ केंद्र सरकार व राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाकडे आहे.( २०१८ ची १०२ क्रमांकाची घटना दुरुस्ती) त्यामुळे मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण नाकारले गेले.

यावेळी इंद्रा सहानी १९९२ च्या प्रकरणाचा संदर्भ घेण्यात आला. यामध्ये एकूण ५० टक्के आरक्षण निश्चित करण्यात आलेले होते. मराठा आरक्षणामुळे ही ५०% ची मर्यादा ओलांडली जात असल्याने हे आरक्षण रद्द करण्यात आले.

याच वेळी आणखीन एक मुद्दा न्यायालयाने प्रकर्षाने नमूद केला की महाराष्ट्र शासनाकडे मराठा समाज हा मागास असल्याबाबतची निश्चित आकडेवारी नाही.

याचा परिणाम म्हणजे न्यायालयाने हे आरक्षण रद्द केले. याचा सर्वसाधारण अभ्यास करून मराठा समाजातील काही गटानी




आम्ही कुणबी आहोत असे म्हणत ओबीसी प्रवर्गात सामील होण्याची मागणी सुरू केली . यावेळी काही जुन्या दस्तऐवजात कुणबी नोंदी सापडल्याचे आधारे हा दावा करण्यात आला. परंतु या संदर्भामध्ये न्यायालयाने स्पष्ट केले आहे की ओबीसी यादीत समावेश करण्याचा अधिकार फक्त केंद्र सरकारचा आहे. राज्य सरकार किंवा स्थानिक प्रशासन स्वतःहून कोणतीही जात ओबीसी मध्ये घालू शकत नाहीत. यामध्ये फक्त वैयक्तिक नोंदीवरून संपूर्ण समाजाला ओबीसी दर्जा मिळू शकत नाही. यासाठी राष्ट्रीय ओबीसी आयोगाचा अभ्यास, पुरावे आणि केंद्र शासनाची मान्यता आवश्यक आहे.

याबाबतच्या न्यायालयीन भूमिकेचा अभ्यास करता मराठा समाजाला खरे तर स्वतंत्र आरक्षणाचा मार्ग न्यायालयाने बंद केला आहे.ओबीसी आरक्षणात मराठी समाजाचे अतिक्रमण होईन होऊ नये म्हणून न्यायालयाने कठोर भूमिका घेतलेली आहे. आता कोणताही निर्णय घेण्यासाठी लोकसंख्याआकडेवारी, सामाजिक आर्थिक सर्वेक्षण, राष्ट्रीय आयोगाचा अहवाल आणि केंद्र सरकारची मान्यता आवश्यक आहे असे स्पष्टपणे नमूद केलेला आहे. या सर्व घटनाक्रमाचा अभ्यास करता आरक्षण हे ओबीसी समाजाचा मूळ हक्क आहे आणि न्यायालयाने तो अबाधित ठेवण्याकडेच कल दर्शवलेला आहे.

आतापर्यंत ओबीसी समाजानेही मराठा समाज हा वेगळा प्रवर्ग आहे व मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण मिळू शकते व त्यांनी ते तसे घ्यावे अशी भूमिका घेतलेली आहे. त्यांनी ओबीसी कोठ्यातून आरक्षणाची मागणी करू नये, असे स्पष्ट बजावलेले आहे . ओबीसी समाज सध्या मराठा म्हणजे कुणबी हा दावा नाकारत आहे. कारण इतिहासातील सामाजिक रचना आणि सरकारी नोंदी, मराठा व कुणबी या वेगवेगळ्या स्वतंत्र ओळखी असल्याचे दर्शवित आहे.

खरे तर ओबीसी समाजाने मराठा समाजाच्या या आरक्षण अतिक्रमन विरोधातली लढाई अत्यंत चांगल्या प्रकारे लढली आहे व ती जिंकली आहे. आता सध्या ओबीसी समाजाने दिलेले आरक्षण हे वाचवणे,िटकवणे व आहे ते राखणे गरजेचे आहे.

ओबीसी समाजातील या लढाईमध्ये ओबीसी समाजातील नेते विधानसभेत व संसदेमध्ये मराठ्यांना स्वतंत्र आरक्षण द्यावे पण ओबीसी आरक्षणाला हात लावू नये अशी मागणी करताना दिसत होते व आहेत. तथापि यामधील मुख्य भाग असा आहे कि सरकार राजकीय दबावापोटी ओबीसींचा हिस्सा कमी करू शकते. असे झाले तर ओबीसींचे होणारे नुकसान परत कधीही भरून येऊ शकणार नाही. मराठ्यांना स्वतंत्र आरक्षण द्यावे परंतु आमच्या आरक्षणावरती अतिक्रमण व्हायला नको. आमचा हिस्सा सुरक्षितच राहिला पाहिजे. ही प्रमुख आणि प्रमुख मागणी ओबीसी समाजातर्फे मांडण्यात येत असली तरी जो प्रभाव आणि मागणी मधील तीव्रता असायला हवी तेवढी मात्र जाणवत नाही. यामध्ये मुख्य भाग हा ओबीसी समाज वेगवेगळ्या जातीमध्ये ज्या पद्धतीने विखुरला आहे ते सर्वजण एकत्र येणे, एका विचारांमध्ये सहभागी होणे व अशा मागणीसाठी एक नेतृत्व मान्य करणे ही आजची मुख्य गरज आहे. ओबीसी समाज आज वेगवेगळ्या ३७३ जातीमध्ये विभागलेला आहे. या प्रत्येक जातीचे वेगवेगळे नेते आपापल्या जातीसाठी स्वतंत्रपणे काम करत आहेत. परंतु ओबीसी प्रवर्ग म्हणून या सर्वांनी एकत्र उठाव करणे नितांत गरजेचे आहे. मनोज जरांगे यांच्या मागच्या आंदोलनाच्या वेळी छगन भुजबळ यांनी ज्या पद्धतीने तीव्र विरोध केला तो यावेळी दिसून येत नाही. या पाठीमागे त्यांची स्वतंत्र भूमिका असेल. त्यांना त्यावेळी झालेला त्रास किंवा ओबीसी समाजाकडून मिळालेला प्रतिसाद कदाचित पुरेसा वाटला नसेल परंतु आज ओबीसी समाजाला त्यांचीही नितांत गरज आहे. या चार पाच दिवसातला घटनाक्रम पाहता जे ओबीसी नेते यासाठी आंदोलन मोर्चे उपोषणे करत आहे ते निश्चितच आवश्यक व अभिनंदनीय आहेत. तथापि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये ओबीसींच्या या विखुरलेल्या जाती व या जातीच्या अंतर्गत विखुरलेला समाज आज एकत्र करण्यामध्ये यशस्वी झाल्याचे दिसून येत नाही, ही वस्तुस्थिती आहे. आज ज्या संख्येने मराठा समाज एकत्रित आलेला आहे, हा एक दिवसाचा लढा नाही किंवा ही एक दिवसाची तयारी नाही. यासाठी घेतला गेलेला कालावधी व आंदोलनाची केलेली तयारी ही निश्चितच वाखाणण्यासारखे आहे. आज आकडेवारी पाहिली तर मराठा समाजापेक्षाही ओबीसी समाजाची संख्या निश्चितच जास्त आहे, असे वाटते. तथापि हा समाज एकत्रित, एकसंघ होत नसल्याने हे आंदोलन ओबीसी नेते एकटेच लढत आहेत असे वाटत आहे. यासाठी ओबीसी समाजातील सर्व नेत्यांना व ओबीसी समाज बांधवांना जाहीर आव्हान आहे की आपण सर्वांनी आपापल्या परीने या आंदोलनाला पाठिंबा देऊन आज या लढणाऱ्या नेत्यांना बळ देण्याची आवश्यकता आहे. तुमचा पाठिंबा कमकुवत आहे असे दिसल्यास व राजकीय नेते या दबावाला बळी पडल्यास स्वतंत्र कायदा करून तुमचे आरक्षण कमी केल्यास तुमच्यासारखे दुर्दैवी तुम्हीच आहात. परत हे आरक्षण मिळविने इतके सहजासजी सोपे नाही याची प्रत्येकाने खून गाठ बांधणे गरजेचे आहे. राजकारण हे सत्तेसाठी कधी बदलेल व तुमचा बळी घेईल हे सांगता येत नाही. यासाठी तुम्ही जागरूक व सावध राहणे तितकेच गरजेचे आहे.

**आपला**
**राम पडघे**
**अध्यक्ष श्री संताजी शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था सातारा महाराष्ट्र.**

# विद्यार्थ्यांच्या चिंताजनक आत्महत्या

अलिकडल्या काळात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांत प्रचंड वाढ झाली आहे. दररोजच्या वर्तमानपत्रात शालेय किंवा महाविद्यालयीन विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची एखादी तरी बातमी असतेच. विद्यार्थी आत्महत्यांच्या वाढत्या घटनेबाबत सर्वत्र चिंता व्यक्त केली जात आहे. भारतातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांबाबत भारतातच नव्हे तर जगभर चिंता व्यक्त होत आहे. मागील वर्षी भारतातील विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांबाबत एक अहवाल प्रसिद्ध झाला होता. नॅशनल क्राईम ब्युरोच्या डेटावर आधारित स्टुडंट्स सुसाईड : अन अपेडेमिक स्वीपिंग इंडिया नावाचा अहवाल वार्षिक आयसी ३ परिषद आणि आणि एक्स्पो २०२४ मध्ये जाहीर करण्यात आला होता. हा अहवाल अतिशय धक्कादायक आहे कारण या अहवालात आपल्या देशातील आत्महत्यांचे वास्तव मांडण्यात आले आहे. या अहवालानुसार देशातील आत्महत्यांच्या दरात कमालीची वाढ झाली आहे. दरवर्षी देशभरात ७० हजारांहून अधिक नागरिक आत्महत्या करत असून यात सर्वात जास्त आत्महत्या पुरोगामी महाराष्ट्रात होत आहेत. त्यातही धक्कादायक आणि चिंताजनक बाब म्हणजे यात सर्वाधिक आत्महत्या विद्यार्थ्यांच्या आहेत. त्यातही पुरोगामी महाराष्ट्राचा पहिला क्रमांक लागतो. महाराष्ट्रात सर्वाधिक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. महाराष्ट्रानंतर तामिळनाडू, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, झारखंड या राज्याचा क्रमांक लागतो. विद्यार्थी आत्महत्येत महाराष्ट्र अव्वल क्रमांकावर असणे ही भूषणावह बाब नसून शिव, फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्राला खाली मान घालायला लावणारी ही बाब आहे. कणखर देशा राकट देशा दगडांच्या देशा असा महाराष्ट्राचा उल्लेख होतो त्यात दुर्दैवाने आत्महत्यांच्या देशा असेही नमूद करावे लागत आहे. आज जगातील सर्वाधिक लोकसंख्या भारतात आहे आणि यात सर्वात जास्त तरुणांची संख्या आहे. भारतात तरुणांची संख्या जवळपास ६० टक्के इतकी आहे. इतके तरुण जगातील कोणत्याच देशात नाहीत म्हणूनच भारताकडे आगामी महासत्ता म्हणून पहिले जाते. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. तरुणांच्या जोरावरच भारत जागतिक महासत्ता बनेल असा विश्वास त्यांना होता. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता बनण्याची स्वप्ने पाहत आहोत तोच तरुण जर असा अकाली मृत्यूला कवटाळू लागला तर देशाच्या भविष्यावरच प्रश्न चिन्ह निर्माण होऊ शकते म्हणूनच विद्यार्थ्यांच्या या आत्महत्या राज्यकर्त्यांनी गांभीर्याने घ्याव्यात आणि आत्महत्या कमी रोखण्यासाठी ठोस धोरण आखायला हवे. अर्थात विद्यार्थी आत्महत्या का करतात याचाही विचार व्हायला हवा. विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांमागे अनेक करणे आहेत त्यातील प्रमुख कारण म्हणजे पालकांच्या मुलांकडून अनाठायी अपेक्षा. शिक्षणातील भयंकर स्पर्धा, गुणांची जीवघेणी चढाओढ, शिक्षण घेऊनही रोजगार न मिळणे, प्रेमभंग या आणि अशा अनेक कारणांमुळे तरुण अकाली मृत्यूला कवटाळीत आहेत. समाज माध्यमांचा वाढता प्रभाव हे देखील विद्यार्थी आत्महत्यांच्या कारणांपैकी महत्वाचे कारण आहे. समाज माध्यमांच्या आहारी गेल्यामुळे मुले खूप भावनिक झाली आहे. आपल्या भावनांना आवर न घालता आल्याने मुले आत्महत्येचा मार्ग स्वीकारीत आहेत. ब्लू व्हेल, पोकोमन यासारख्या हिंसक गेम्समुळे देखील अनेक मुलांनी आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. विद्यार्थ्यांना पालकांकडून हल्ली अनेक गोष्टी सहज उपलब्ध होऊ लागल्या आहेत त्यामुळे एखादी गोष्ट जेंव्हा मिळत नाही तेंव्हा ती मिळावी यासाठी विद्यार्थी अट्टाहास करतात मग त्यांना त्यात अप्याश आले की ते मृत्यूला कवटाळतात म्हणून पालकांनी मुलांना नकार पचवायला शिकवले पाहिजे. पालकांनी मुलांवर अपेक्षांचं ओझेही लादू नये. विद्यार्थी आत्महत्या म्हणजे देशाची मोठी हानी त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्याची जबाबदारी केवळ पालकांचीच आहे असे नाही तर शाळा, कॉलेज, शिक्षक, समाज आणि शासनाचीही आहे. या सर्व घटकांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखणयासाठी प्रयत्न करायला हवेत.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**


## जाहिरात..

गणेश पावतो नवसा
मंडळे करी जाहिरात
भक्तमंडळी रे सक्रिय
गर्दी वाढवी रातोरात

विश्वास ठेवी भाविक
उस्फुर्त भावनाभरात
ओघ इथला वाढावा
असो ईश्वर चराचरात

सेलिब्रिटीनाबोलवावे
नेत्यांची काढा वरात
फटाफट पावती फाटे
देणग्यांचे ओघजोरात

नारळ तोरण बांधावे
विक्रमी विक्री हारात
सोने नाणी भेटी वस्तु
फळे मिठायात खैरात

व्यवसाय ते तेजीमध्ये
लक्ष्मीअवतरते दारात
भाव घे अव्वाचे सव्वा
बार्गेनिंग ना करे दरात

मिडीयाला करे तैनात
लोण पसरो क्षणार्धात
नास्तिकहोई आस्तिक
माणूसपिचला स्पर्धात

**– हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज

# गौरी गणपती सजावट विशेष



अक्षराज मिडियाचे संपादक व सहसंपादिका यांच्या घरचा गणपती बाप्पा



श्री. संजीवन व सौ. मिना चव्हाण, दिघी (पुणे) यांच्या घरातील गौराई समोर साकारले 'वारी पंढरीची' हे आकर्षक दृश्य



श्री. संजीवन व सौ. मिना चव्हाण, दिघी (पुणे) यांच्या घरचा गणपती बाप्पा



श्री. रामचंद्र व सौ. लता पडगे, नागठाणे (सातारा) यांच्या घरच्या गौराई



श्री. प्रशांत व सौ. प्रियांका चव्हाण, नेरुळ (नवी मुंबई) यांच्या घरच्या गौराई



श्री. सागर व सौ. सिमा चव्हाण, घणसोली (नवी मुंबई) यांच्या घरच्या गौराई



सुहास महांगरे, मु. पो. विंग जि. सातारा यांच्या घरच्या गौराई



संजय लिमकर, गिरगांव (मुंबई) यांच्या घरचा गणपती बाप्पा



डॉ.निलेश राणे यांच्या घरातील गणपती, सोबत कु.अवनिश निलेश राणे



पत्रकार संजय पंडीत, ठाणे यांच्या घरील बाप्पा



साईनाथ भोईर, शिळगांव (ठाणे)यांच्या घरचा गणपती बाप्पा



निकित पाटील, अंबरनाथ (ठाणे) यांच्या घरचा गणपती बाप्पा



लासलगाव पोलीस स्टेशनचे सहा.पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे, संपादक अभय पाटील व डोंगरे दादा यांचे विंचूर येथे पत्रकार सुनील क्षिरसागर यांच्या घरी गौरी-गणपती दर्शन



मंगेश औटी, नवी मुंबई यांच्या घरच्या गौराई व गणपती बाप्पा



ह. भ. प. तुषार पावशे मु.बामल्ली पो.वळकण ता. कल्याण जि. ठाणे यांच्या घरचा गणपती बाप्पा



चंद्रकांत धोंडिबा साळेकर गाव घणसोली जिल्हा ठाणे यांच्या घरच्या गौराई



शिवाजी औसेकर, केज, जिल्हा बीड यांच्या घरच्या गौराई



अमोल यंडाईत, चिखली जि. बुलढाणा यांच्या घरचा गणपती बाप्पा



उषा होमकर, टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर जि. अहिल्यानगर यांच्या घरचे गौरी गणपती



अतुल सैद सर, टाकळी ढोकेश्वर जि.अहिल्यानगर त्यांच्या घरातील गौरी गणपती



भूषण वझेकर, रा. महालक्ष्मी नगर न. २, नागपूरयांच्या घरचा गणपती बाप्पा

# थोडक्यात

## कुंडलवाडीचा भूमिपुत्र उपेंद्र हमंद भारतीय नौदलात दाखल



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०२, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी शहरातील वंजारगल्ली येथील शेतकरी कुटुंबातील संतोष सयाराम हमंद यांचा मुलगा उपेंद्र संतोष हमंद या सुपुत्राची भारतीय नौदलात निवड झाल्याची आनंदाची बातमी आहे. लिटील फ्लॉवर कॉन्व्हेंट स्कूल, बिलोली येथे दहावीपर्यंत इंग्रजी माध्यमात शिक्षण घेतल्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथील समर्थ आर्टस् कॉलेजमधून बारावी शिक्षण पूर्ण केले. यानंतर स्पर्धा परीक्षेची तयारी त्याने छत्रपती संभाजीनगर येथील गरुड झेप अकॅडमीमध्ये केली. कठोर परिश्रम, जिद्द व चिकाटीच्या जोरावर अखेर त्याची भारतीय नौदलात निवड झाली आहे. या यशामुळे कुंडलवाडी गावाचे नाव अभिमानाने उंचावले असून ग्रामस्थ, नातेवाईक व मित्रपरिवाराकडून निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे. समस्त वंजारी समाज बांधव व मित्र परिवाराच्या वतीने गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. वंजारी समाज गणेश मंडळ, स्वराज्य गणेश मंडळाच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला, त्याच्या हस्ते आरती देखील करण्यात आली. उपेंद्रच्या या कामगिरीमुळे कुंडलवाडी शहरात अभिमानाचे व आनंदाचे वातावरण असून सर्वत्र त्याचे अभिनंदन होत आहे.

## घरफोडी प्रकरणातील २ आरोपी अटकेत, १.१० लाखांचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**

**दि.०१, बदलापूर :** बदलापूर पूर्व पोलीस ठाण्याच्या पथकाने घरफोडी प्रकरणाचा छडा लावत दोन सराईत आरोपींना अटक केली असून त्यांच्या ताब्यातून १,१०,४२८ किमतीचा चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुनीता मदन कनोजिया (वय ४५, रा. गणेश दर्शन अपार्टमेंट, आपटेवाडी, बदलापूर पूर्व) यांच्या बंद घराचे कुलूप २८ ऑगस्ट रोजी दुपारी ४.०० ते सायं. ६.१५ या वेळेत अज्ञात चोरट्यांनी तोडले होते. या घरफोडीत दागिने व रोकड असा एकूण ₹५०,००० किमतीचा ऐवज चोरीला गेला होता. या प्रकरणी गु.र.नं. ५०४/२०२५ भा.दं.वि. कलम ३०५, ३३१(१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी ३० ऑगस्ट रोजी पहाटे १.१५ वाजता दोन आरोपींना अटक केली. अटक आरोपी अशी आहेत –

१.आदित्य अशोक राम (वय २३, रा. बदलापूर पूर्व)

२.हर्षद भरत अनुभवणे (वय २९, रा. बदलापूर पूर्व)

चौकशीत आरोपींनी आणखी तीन घरफोडी गुन्ह्यांची कबुली दिली असून त्यात गु.र.नं. ५०५/२०२५ (कलम ३०५, ३३१(१), ३(५)), गु.र.नं. ५०६/२०२५ (कलम ३०५, ३३१(३), ३३१(४), ३(५)), गु.र.नं. ५०७/२०२५ (कलम ३०५, ३३१(३), ३३१(४), ३(५))

असा समावेश आहे. या सर्व प्रकरणांमधून पोलिसांनी मिळून ₹१,१०,४२८ किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. सध्या आरोपींना ४ सप्टेंबर २०२५ पर्यंत पोलीस कोठडी मिळाली असून, त्यांच्या ताब्यातून आणखी गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे बदलापूर पूर्व पोलिसांनी सांगितले.

## पाटण तालुक्यात गौरी, गणपतीचे जड अंतकरणाने विसर्जन संपन्न



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०२, पाटण (सातारा) :** गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या... गणपती गेले गावाला, चैन पडेना... आम्हाला अशा घोषणा देत पाटणसह परिसरातील गणेश भक्तांनी मंगळवार, दिनांक ०२ सप्टेंबर २०२५ रोजी ५ दिवसांच्या घरगुती गणपतींचे व गौरीला कोयना व वकेरा, नदीपात्रामध्ये जड अंतकरणाने निरोप दिला. तर ठिकठिकाणी असणाऱ्या पानवठ्यावर विसर्जन केले. लहान चिमुकल्यांसह अबाल-वृध्द, युवक, महिलांनी गणपती बाप्पांना निरोप देण्यासाठी कोयना नदी परिसरात गर्दी केली होती. आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देताना भाविकभक्तांसह चिमुकल्यांनाही भक्तांनी गौरीच्या विसर्जनावेळी महिलांना गहिवरून आल्याने दिसत होते. ५ दिवसांच्या पाहुणचारानंतर आपल्या लाडक्या बाप्पांचा निरोप मंगळवारी घेतला. श्री गणेश चतुर्थीला मोठ्या आनंदाने भाविकांनी गणरायाचे आगमन केले. त्यावेळी असणारा तोच आनंद आणि तोच उत्साह गणेशमकांच्या चेहऱ्यावर आजही ओसंडून वाहत असल्याचे दिसून येत होते. लहान मुलांसह अबालवृध्द पाच दिवसांच्या गणपती बाप्पांना निरोप देताना गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या. गणपती गेले गावाला, चैन पडेना आम्हाला अशा घोषणांचा जयजयकार करत होते. त्यामुळे सारा परिसर घोषणांनी दणाणून गेला होता. तर गणपती बप्पांना विसर्जनासाठी गणेश मूर्ती घेवून जाताना दिसत होते. तर दुसरीकडे सुवासिनी महिलांनी देखील तीन दिवसांमध्ये लाडक्या गौवराई हौसमौज करून गौवराईचे उत्साहात विसर्जन केले. यावेळी पाटणसह परिसरातील महिला व युवती पारंपरिक वेशभूषेत शहरातील कोयना-केरा नदीकाठावर असणाऱ्या शिवमंदिर परिसरात जमल्या होत्या. त्या ठिकाणी शेकडो महिलांनी गौवरांईच्या गाण्यावर फेर धरत गौवराईची गाणी सादर केली. त्यामुळे वातावरण आनंदीमय झाले होते. त्यानंतर, गणपती, गौरीला, जड अंतकरणाने कोयना व केरा, नदीपात्रात विसर्जन केले.

## ७ दिवसांच्या बापाचे विसर्जन

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०२, शिळगाव (ठाणे) :** शिळगावातील ग्रामस्थांच्या निवासस्थानी ७ दिवसासाठी विराजमान झालेले गणपती बाप्पाचे मंगळवार, दिनांक ०२ सप्टेंबर २०२५ रोजी विसर्जन करण्यात आले. निरोप घेतो देवा आता आज्ञा असावी, चुकले आमचे काही तर क्षमा असावी..., गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरया..., पुढच्या वर्षी लवकर या, एक दोन तीन चार गणपतीचा जयजयकार, उंदीर मामा की जय, अशा घोषणा देत गुलाल उधळीत बँजो बँड वाजवीत नाचत गाजत ग्रामस्थांनी देव बाप्पाला निरोप देत होते. अनेक वर्षापासून परंपरा चालत आलेली ग्रामस्थांनी कायम राखली आहे ग्रामस्थांनी डोक्यावर गणपती, गौरी माता घेऊन तसेच फोर व्हीलरमध्ये टेम्पोमध्ये गणपती बाप्पाला घेऊन विसर्जनासाठी चालले होते. सर्व ग्रामस्थांचे गणपती एकत्र घेऊन गावदेव तलाव कडे चालले होते. निरोप देताना ग्रामस्थांच्या डोळ्यात अश्रू दिसत होते. तूच सुखकर्ता तूच दुखहर्ता तूच विघ्नहर्ता, गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरया

# मुसळधार पावसाने चंद्रपूर जिल्हा बेहाल; अनेक मार्ग बंद

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, चंद्रपूर :** मागील २४ तासात चंद्रपूर जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत केले आहे. जिल्ह्यातील अनेक मार्ग पावसामुळे बंद करण्यात आले असून, जिल्ह्यात एकूण सरासरी ५० मिमी पावसाची नोंद करण्यात आली आहे. इरई धरणाचे सातही दरवाजे उघडल्याने नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

दिनांक ०१ सप्टेबर २०२५ रोजी सायंकाळपासून जिल्ह्यात मुसळधार पावसाला सुरुवात झाली होती. या पावसामुळे इरई धरणाच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाल्याने २ सप्टेबरला सकाळी ७ वाजता धरणाचे तीन दरवाजे १ मीटरने तर ४ दरवाजे ०.७५ मीटरने उघडण्यात आले आहे.

**इरई धरणाचे दरवाजे उघडल्याने या गावांना सतर्कतेचा इशारा**

पद्मापूर, किटाळी, मसाळा, पडोली, यशवंतनगर, दाताळा, आरवट, नांदगाव (पोडे), भटाळी, वढोली, चिंचोली, कढोली, पायली, खैरगाव, चांदसुरला, विचोडा( बुजूर्ग), आंभोरा, लखमापूर, कोसारा, खुटाळा, हडस्ती, चारवट, कवटी, चेक तिरवंजा, देवाळा, चोराळा, हिंगनाळा, चिंचोली, मिनगाव वडगाव, चंद्रपूर, माना, आणि इतर इरई नदीच्या काठावर राहणाऱ्या सर्व नागरिकांनी योग्य ती काळजी घ्यावी, असे आवाहन चंद्रपूर जिल्हा प्रशासनाने केले आहे.

**अनेक मार्ग बंद, प्रशासनाची बचाव मोहीम**

कारवा - बल्लारपूर रोड वरील नाल्याला आलेल्या पुरामुळे १२ नागरिक अडकले होते, याबाबत बल्लारपूर प्रशासनाला माहिती मिळताच रात्री १२ वाजता तहसील कार्यालय बल्लारपूर मध्ये उपलब्ध असलेले बचाव साहित्य सोबत घेत कर्मचाऱ्यांनी नागरिकांना सुखरूप पणे कारवा मधील खेमाजी नाईक आश्रम शाळा मध्ये थांबण्याची व्यवस्था केली त्यानंतर तहसील कार्यालयाच्या वाहनाने नागरिकांना बल्लारपूरमध्ये पोहचविण्यात आले.

मार्ग बंद :- चंद्रपूर, धानोरा ते भोयेगाव मार्गावरील पुलावर पाणी आल्याने सदर मार्ग वाहतुकीसाठी पूर्णत: बंद कपण्यात आला. मूल तालुका : - फिस्कुटी ते चिंचाळा नदी नदी पुलावरुन पाणी जात असल्याने सदर मार्ग बंद, चिरोली- केळझर मार्ग बंद, चिंचोली गावाजवळील रेल्वे बोगद्यात पाणी असल्यामुळे काटवन ते मुल मार्ग बंद, काटवम ते मूल मार्ग येण्याकरीता मारोडा हा पर्यायी मार्गाचा नागरिकांनी अवलंब करावा. वरोरा तालुका : - कोसरसार ते बोडखा रस्ता बंद, अर्जूनी नदीच्या पूलावरुन पाणी वाहत असल्याने




चारगाव ते खूर्द अर्जूनी मार्ग बंद, मौजा सूर्ला ते जामगाव बुज. मार्ग पुराच्या पाण्यामुळे बंद, भद्रावती तालुका :- मौजा गुंजाळा नाल्यावर पाणी जास्त वाढलेले असून नाल्या शेजारील काही घरात पाणी शिरलेलं आहे. मौजा गुंजाळा कचराळा वाहतुक रस्ता बंद.कोरपना तालुका : - इरई भारोसा मार्ग बंद, भोयेगाव धानोरा मार्ग पुलावरुन पाणी वाहत असल्याने मार्ग बंद करण्यात आला. बल्लारपूर तालुका : - पळसगाव- कवडजई मार्गावरील रंगीत यांच्या शेताजवळील पुल तीन फ ुट उंच पाण्याने डुबून असल्याने रहदारी बंद करण्यात आली आहे. इरई नदीवरील पुलावर पाणी आल्यामुळे मौजा चारवट माना चंद्रपूर मार्ग वाहतुकीसाठी बंद झाला आहे. काटवली ते बामणी मार्ग बंद.

# जरांगेचं उपोषनाचं श्रेय शेवटी विखेंनांच...

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०२, सुपा (अहिल्यानगर) :** आजच्या मराठा आंदोलनाच्या निमित्ताने ज्या काही मागण्या गरजवंत मराठ्यांच्या पदरात पडल्या. यात एक गोष्ट लक्षात घ्या की सरकार ला झुकण्यास भाग पाडाव लागल आणि हे फक्त गरीब मराठ्यांनी सरकार गुडघ्यावर आणल यासाठी जे लोक आंदोलनात होते. जिनी जो त्रास सहन केला त्यांच्या परिश्रमाच चीज आहे शिवाय खेड्यापाड्यातून आलेले मराठा बांधवानी जर मुंबईत फक्त ५ टक्के मराठा आले तर मुंबईच जीवनमान हे विस्कलीत झाल आणि जर अजून ६०-७० टक्के आले असते तर काय परस्थिती झाली असती फक्त कल्पना करा आणि यात पुढील टप्प्यात राज्यातून विविध भागातून महिला वर्ग सहभागी होणार होता. सरकार ला या आंदोलनाच गांभीर्य सम जण्यास वेळ लागला यात सरकारी यंत्रणाच अपयश



शिवाय आंदोलन स्थळी सुरवातीला जो जाणीवपूर्वक त्रास दिला यातून मराठा बांधव चिडून एकवटला. एक म्हण आहे. परिस्थिती जेवढी बिकट मराठा तेव्हढा तिखट हे मान्य करावा लागल.

यामुळे प्रशासन व सरकार व राजकीय नेते. यांच्यावर प्रचंड दबाव होता मराठा एकवटला तर इतिहास घडतो हे सत्य आजही नाकारता येत नाही.

विद्यमान सरकार ने काही अति मान्य करत काही अंशी मराठा समाजाचा राग शांत करण्याचा प्रयत्न केला. शिवाय आंदोलन काळात राज्याचे मुख्यमंत्री यांनी मार्था आंदोलकांकडून प्रचंड आरोप होत असताना शांतपणे समितीच्या कामवर लक्ष देऊन महत्वाच्या मुद्याचा म सुदा तयार करून काही अंशी प्रमाणात न्याय देण्याचा प्रयत्न केला. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचे अभिनंदन, सोबत समितीचे अध्यक्ष अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे ही मनापासून अभिनंदन, पुढील काळात सरकार हे सर्व शब्द पाळेल अशी अपेक्षा वाटते. तूर्तास मराठा समाज आणि सरकार दोघांच ही मनापासून अभिनंदन राहुल शिंदे पाटील यांनी पारनेर तालुक्याच्या वतीने केले.

# ईद-ए-मिलाद व गणेश विसर्जनाच्या दिवशी मद्य विक्रीवर बंदी

## जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश; उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई होणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, बुलडाणा :** जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यात आगामी ईद-ए-मिलाद, अनंत चतुर्दशी व गणेश विसर्जन या दिवशी कोरडा दिवस अर्थात मद्य विक्री बंदीचा आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जारी केला आहे. महाराष्ट्र दारुबंदी कायद्याअंतर्गत जारी आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व देशी व विदेशी मद्य विक्री अनुज्ञप्तीधारकांची दुकाने बंद ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.

यानुषंगाने जिल्ह्यातील एफएल-२, एफएल-३, एफएल-४, एफएल/बीआर-२ व सीएल-३ अनुज्ञप्तीधारकांना आपली दुकाने व मद्य विक्री केंद्रे संबंधित दिवशी बंद ठेवण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तसेच आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकाविरुद्ध कडक कारवाई केली जाईल, असा इशारा ही जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे.

'या' दिवशी राहणार कोरडा दिवस

५ सप्टेंबर २०२५ (शुक्रवार): ईद-ए-मिलाद निमित्त संपूर्ण दिवस दारूबंदी.

६ सप्टेंबर २०२५ (शनिवार): अनंत चर्तुदशीच्या दिवशी कायद्यानुसार दारूबंदी लागू.

७ व ८ सप्टेंबर २०२५: ज्या दिवशी व ठिकाणी गणेश विसर्जन होईल, त्या ठिकाणी विसर्जन सोहळा पूर्ण होईपर्यंत दारूबंदी राहणार आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या



अधिकाऱ्यांना या आदेशाची अंम लबजावणी काटेकोरपणे करण्याचे निर्दे श देण्यात आले आहेत. प्रत्येक उत्सव काळात अवैध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्रीवर देखील बारीक लक्ष ठेवावे, असे आदेशात नमूद केले आहे.

याव्यतिरिक्त, संबंधित कार्यक्षेत्रात काही अनुचित घटना घडल्यास त्याबाबत संबंधित दुय्यम निरीक्षकांना थेट जबाबदार धरले जाईल, असा इशारा देखील अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी दिला आहे.

# दर सोमवारी तहसील कार्यालयात जनता दरबार; पालकमंत्री डॉ. भोयर यांचे निर्देश

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, भंडारा :** भंडारा जिल्ह्याचे नवनियुक्त पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिनांक ०१ सप्टेंबर २०२५ रोजी नियोजन सभागृहात जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेतली. या बैठकीत दर सोमवारी तालुकास्तरावर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली जनता दरबार आयोजित करण्यात यावा, असे निर्देश त्यांनी दिले.

या जनता दरबारात गटविकास अधिकारी, कृषी, ऊर्जा, आरोग्य, शिक्षण आदी तालुकास्तरीय यंत्रणांचे अधिकारी उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या, निवेदन हरकती आणि सूचना स्वीकारतील. संबंधित तक्रारी व म ागण्या त्या-त्या यंत्रणेकडे पाठवून त्यांचे निराकरण करण्याची जबाबदारी तहसीलदारांकडे असेल.पालकमंत्री



डॉ. भोयर यांनी स्पष्ट केले की, तहसीलदारांच्या स्तरावर न सुटणारे प्रश्न उपविभागीय अधिकारी आणि आवश्यक असल्यास जिल्हाधिकारी स्तरावर मांडले जातील. यामुळे जनतेच्या अडचणींचे त्वरित व प्रभावी निराकरण होण्यास मदत होईल. या झालेल्या बैठकीला खासदार डॉ. प्रशांत पडोळे, आमदार राजू कारेम ोरे, जिल्हाधिकारी सावन कुमार, पोलीस अधीक्षक नुरुल हसन, मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंदकुमार साळवे , उपवनस संरक्षक योगेंद्रसिंह, तुमसर उपविभागीय अधिकारी कश्मीरा संखे, उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्र्यांनी जिल्ह्यातील प्रमुख समस्या, तसेच विविध विभागांम धील रिक्त पदांची माहिती घेतली. महसूल प्रशासन हा संपूर्ण व्यवस्थेचा कणा असल्याने तहसीलदारांनी सामान्य नागरिकांच्या छोट्या-छोट्या समस्या सुद्धा गांभीर्याने सोडवाव्यात, असे त्यांनी अधोरेखित केले.

दर आठवड्याला या जनता दरबारातील कार्यवाहीचा अहवाल जिल्हा माहिती कार्यालयामार्फत प्रसिद्धी माध्यम ांना पाठविण्याचे निर्देश देण्यात आले. सर्व विभागांनी प्रलंबित बाबी तत्काळ निकाली काढाव्यात, पूर्ण झालेले प्रकल्पांची यादी जिल्हाधिकारी यांना द्यावी, असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येणाऱ्या १५० दिवसांच्या लोकाभिमुख कार्यक्रमाअंतर्गत शून्य प्रलंबित धोरण काटेकोरपणे अंमलात आणण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच सप्टेंबर महिन्यात शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या सेवा पंधरवड्यात सामान्य नागरिकांना शासकीय सेवा जलद गतीने पोहोचविण्यावर भर द्यावा, असेही पालकमंत्री डॉ. भोयर यांनी सांगितले.

अक्षराज



# ईद-ए-मिलाद, गणपती विसर्जन मिरवणूकीच्या पार्श्वभूमीवर ५ - ६ सप्टेंबर रोजी शहरातील वाहतुक व्यवस्थेत बदल

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** चंद्रपूर शहरात दिनांक ०५ सप्टेंबर २०२५ रोजी ईद-ए-मिलाद निमित्त आयोजित जुलूस व रॅली तसेच दिनांक ०६ सप्टेंबर २०२५ रोजी गणपती विसर्जन मिरवणुकीमुळे शहरातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आला आहे. ईद-ए-मिलाद निमित्त ५ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजतापासुन दुपारी ३ वाजेपर्यंतच्या कालावधीसाठी खालीलप्रमाणे वाहतूक वळविण्यात आली आहे.

कोहिनूर ग्राउंड-दस्तगीर चौक-मिलन चौक-गांधी चौक- जयंत टॉकीज चौक -जटपुरा गेट ते प्रियदर्शनी चौक व प्रियदर्शनी चौक- जटपुरा गेट-कस्तुरबा रोडने कोहीनुर ग्राउंड पर्यंतचा रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांना बंद ठेवण्यात येत आहे. तसेच सदरचा रस्ता नो पार्किंग झोन म्हणुन घोषित करण्यात येत आहे. नागपुरकडून शहरामध्ये जाणारी वाहने (जड वाहने वगळून) घुटकाळा, श्री टॉकीज, पठाणपुरा परिसरात जायचे असल्यास जुना वरोरा नाका चौकातून उजवीकडे वळण घेऊन रामनगर- संत केवलराम चौक- सेंट मायकल स्कुल-सवारी बंगला चौक –नगिनाबाग ते चोर खिडकी मार्गे शहरात प्रवेश करतील. शहरातील नागरिकांनी नागपुर, वणी, घुग्घुस, गडचांदूरकडे जाणाऱ्या प्रवाशांनी रहमतनगर, नगिनाबाग व इतर परिसरातून जाण्यासाठी बिनबा गेट- रहेमत नगर, दाताळा इत्यादी मार्गाचा अवलंब करावा.

बल्लारशा व मुलकडुन येणाऱ्या वाहनांना (जड वाहने वगळून)) शहरामध्ये जायचे असल्यास बसस्टँड-एलआयसी ऑफीस-बगड खिडकी मार्गे किंवा जुनोना चौकातून शहरामध्ये किंवा प्रसन्ना पेट्रोलपंप कडून बाबुपेठ मार्गे शहरात प्रवेश करता येईल.

**गणेश विसर्जनानिमित्त बदल :** - ६ सप्टेंबर रोजी चंद्रपूर शहरामध्ये गणपती विसर्जन मिरवणूक निघणार आहे. या मिरवणुक मार्गावर देखावे पाहण्याकरीता नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रियदर्शनी चौक - जटपुरा गेट-कस्तुरबा चौक - गांधी चौक - जटपुरा गेट - रामनगर - संत केवलराम चौक- ईरइ नदी (रामसेतू पुल) या मुख्य मिरवणुकीच्या मार्गावरील रहदारीमध्ये ६ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजता पासून ते ७ सप्टेंबर रोजीच्या सकाळी ६ वाजेपर्यंतच्या शहरातील वाहतुक खालीलप्रमाणे वळविण्यात येणार आहे.

गणेश विसर्जन मुख्य मिरवणुक सोहळा पार पड़ेपर्यत प्रियदर्शनी चौक - जटपुरा गेट-कस्तुरबा चौक - गांधी चौक - जटपुरा गेट - रामनगर रोड - संत केवलराम चौक- ईरइ नदी (रामसेतू पुल) हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांना बंद करण्यात येत आहे. नागपूर रोडने येऊन बल्लारशा किंवा मुलकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने हे प्रियदर्शनी चौककडे जाण्यास बंदी करून सर्व प्रकारची वाहने ही वरोरा नाका उड्डान पुल- सावरकर चौक ते बंगाली कॅम्प, मुल किंवा बल्लारशाकडे जातील. मुल किंवा बल्लारशा कडुन नागपूरकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने ही बंगाली कॅम्प -सावरकर चौक -वरोरा नाका -नवीन उड्डाणपुल मार्गे नागपूरकडे जातील. नागपूरकडून शहरामध्ये जाणारी सर्व वाहने (जड वाहने वगळून) छोटा नागपुर मार्गे दाताळा चौक-देवाळा गांव-चोराळा टी पॉईट वरून बिनबा




गेट किंवा पठाणपुरा गेट मधून शहरात प्रवेश करतील. शहरातील नागरिकांनी नागपुर, वणी, घुग्घुस, गडचांदुरकडे जाण्याकरीता रहमत नगर, नगीनाबाग व इतर परिसरातुन जाण्यासाठी बिनबा गेट- चोराळा-दाताळा इत्यादी मार्गाचा अवलंब करावा.

बल्लारशा व मुल कडुन येणाऱ्या सर्व वाहनांना (जड वाहने वगळून) शहरामध्ये जायचे असल्यास बस स्टॅंड-एलआयसी ऑफीस-बगड खिडकी मार्गे किंवा जुनोना चौकातुन शहरामध्ये किंवा प्रसन्ना पेट्रोल पंप कडुन बाबुपेठ मार्गे शहरात फक्त अंचलेश्वर गेटपर्यंत प्रवेश करता येईल. **ही ठिकाणे आहेत नो पार्कींग झोन व नो हॉकर्स झोन : -**

जटपुरा गेट ते कस्तुरबा चौकपर्यंत, जटपुरा गेट ते रामनगर रोड मार्गे राम सेतू पुलपर्यंत, जटपुरा गेट ते प्रियदर्शनी चौकपर्यंत, कस्तुरबा चौक ते गांधी चौक ते जटपुरा गेट, कस्तुरबा चौक ते अंचलेश्वर गेटपर्यंत, गांधी चौक ते मिलन चौक ते जोड देऊळपर्यंत, कस्तुरबा चौक ते जेल रोड चौक, दस्तगीर चौक ते मिलन चौक, मिलन चौक ते बजाज पॉलीटेक्नीक कॉलेज, हिंदी सिटी हायस्कुल ते रघुवंशी कॉम्प्लेक्सपर्यंत, मौलाना आझाद चौक ते जयंत टॉकीज, छोटा बाजार चौक ते पाताळेश्वर मंदीर. नो-पार्किंग व नो- हॉकर्स झोन म्हणुन घोषित केल्याने मिरवणुक व वाहतूक मार्गावर नागरिकांनी, व्यवसायिकांनी तसेच गणेश विसर्जन भक्तांनी कोणत्याही प्रकारची वाहने पार्किंग/उभी करू नये. मुख्य मिरवणुक मार्गावर राहणाऱ्या रहिवाशांना स्वतःची पार्किंगकरीता जागा नसल्यास त्यांना आपली वाहने १) जुबली हायस्कुलचे पटांगण २) महानगरपालीकेच्या बाजुला असलेली पार्किंग या ठिकाणी उभी करावी.

**पार्किंग व्यवस्था : -**

चांदा क्लब ग्राउंड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, वरोरा नाका, सेंट मायकल हायस्कुल, नगीनाबाग, सिंधी पंचायत भवन, संत केवलराम चौक जवळ रामनगर, व्यायाम शाळा ग्राउंड, पठानपुरा चौक, डी.एड. कॉलेज ग्राउंड बाबुपेठ, महाकाली मंदीर ग्राउंड, चंद्रपुर जुलूस रॅली तसेच विसर्जन मिरवणूक काढणाऱ्या सर्व मंडळांनी तसेच नागरिकांनी देखील वाहतुकीच्या नियमाचे पालन करावे. कोणीही तरतुदीचे उल्लघंन केल्यास ते कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहतील, असे आदेश जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांनी निर्गमित केले आहे.

# व्हॉट्सॲपवरून दिलेल्या तक्रारीनंतर आयुक्तांचा तडकाफडकी आदेश
# विरार फाटा येथील अनधिकृत बांधकाम तोडायला सुरुवात

**अक्षराज : विनायक बोईर**

**दि.०१, वसई (पालघर) :** वसई तालुक्यातील टोकरे ग्रामपंचायत हद्दीत गेल्या अनेक वर्षांपासून सुरु असलेली अनधिकृत बांधकामे थांबवण्यासाठी ग्राम पंचायत प्रशासनाने आक्रमक भूमिका घेतली होती. परंतु, वारंवार वसई विरार महानगरपालिकेला पत्रव्यवहार करूनही कारवाई होत नसल्याने ग्रामपंचायत व ग्राम स्थांमध्ये संताप उसळला होता.विशेषतः विरार फाटा येथील सर्वे नं. ७५ मध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकाम सुरु असल्याची तक्रार ग्रामपंचायतने दीपक सावंत तसेच सहायुक्त गणेश पाटील यांच्याकडे अनेकदा केली होती. मात्र, त्यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही होताना दिसली नाही. उलट गणेश पाटील हेच या अनधिकृत बांधकामाला पाठीशी घालत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर ग्रामपंचायतीने थेट मंत्र्यांचा संदर्भ घेत आयुक्तांकडे गणेश पाटील व दीपक सावंत यांची तक्रार केली.बांधकामाचा पाया टाकला तेव्हापासून आम्ही सातत्याने तक्रारी करत आलो आहोत. आज हे बांधकाम मोठ्या प्रमाणावर झाले आहे आणि व्यावसायिक आणखी जोरात बांधकाम करत आहेत..! असे ग्रामपंचायतीने आयुक्त यांच्या निदर्शनास आणून दिले होते.

ग्रामपंचायतीच्या कमिटीने वसई विरार आयुक्त साहेबांना थेट व्हॉट्सॲपवर मेसेज पाठवत, कृपया अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेले हे अनधिकृत बांधकाम तोडा..! अशी मागणी केली. यावर आयुक्तांनी तात्काळ Will take action असा रिप्लाय देत कारवाईचे आश्वासन दिले. आणि मग सुट्टीच दिवस असतानाही नगरपालिकेचे अधिकारी अचानक कारवाईसाठी दाखल झाले. विरार फाटा येथे सुरू असलेले अनधिकृत बांधकाम तोडण्यास सुरुवात झाली असून, ग्रामपंचायतीचे दीर्घकाळापासूनचे प्रयत्न अखेर यशस्वी ठरले आहेत.टोकरे ग्रामपंचायतीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि ग्रामस्थांच्या दबावामुळे अखेर महानगरपालिका प्रशासनाला कारवाईस भाग पाडावे लागले, ही आनंदाची बाब आहे.

# प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने शिवशंभो गणेश मंडळ सुपा येथे कार्यक्रम

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०२, सुपा (अहिल्यानगर) :** प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय यांच्या तर्फ गणेशोत्सवानिमित्त विविध आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित केले जाते. ज्यामध्ये गणेशोत्सवाचे आध्यात्मिक रहस्य, गणपतीची भक्ती गीते आणि ध्यान यांचा समावेश होता. प्रजापिता ब्रह्मकुमारी प्रतिमा दीदी यांनी श्री गणेश यांची कथा सांगितली.जेव्हा देवी पार्वती स्नान करायला जाते तेव्हा कोणीतरी दाराचे रक्षण करावे. म्हणून तिने तिच्या शरीरातील धूळ झटकून टाकली आणि एका मुलाला निर्माण केले. त्यात जीवन फुंकले आणि त्याला दाराबाहेर पहारा म्हणून उभे राहण्यास सांगितले. नंतर जेव्हा शंकरजी १० वर्षांच्या तीव्र तपश्चर्येनंतर घरी परतले तेव्हा बाळ श्री गणेशने त्याच्या आईच्या आज्ञेनुसार त्याला आत येऊ देण्यास नकार दिला. मग तो रागावला आणि मुलाचा शिरच्छेद केला. ज्यामुळे मुलाचा जीव गेला, परंतु वस्तुस्थिती जाणून घेतल्यानंतर, शंकरजींनी त्याच्या शरीरावर हत्तीचे डोके ठेवून मुलाला पुन्हा जिवंत केले.पार्वतीजी एक देवी होती, तिच्या शरीरावर धूळ कशी आली ज्यापासून तिने मूल निर्माण केले? आणि वर्षानुवर्षे तपश्चर्या नंतर परतल्यानंतर ही भगवान शंकरजी इतके रागावले कसे? तसेच, ते एक दयाळू देव आहेत म्हणून त्यांनी एका क्षुल्लक गोष्टीसाठी एका निष्पाप मुलाचा शिरच्छेद का केला? आणि मग श्री गणेशजींना त्याचे जुने मानवी शिर परत का मिळाले नाही तर हत्तीचे डोके का मिळाले?प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय यांच्या प्रतिमा दीदी पुढे असे म्हणाले की,कथेमागील साराचे आत्मपरीक्षण केल्याने असे दिसून येते की वरील प्रश्नांची उत्तरे आपल्या स्वतःच्या जीवनाशी संबंधित आहेत. श्री पार्वतीजींनी त्यांच्या शरीरातून जन्मलेले मूल आपल्या शरीराचे भावनेचे प्रतिनिधित्व करते. श्री गणेशाचा अहंकार त्याला त्याच्या वडिलांना ओळखू देत नव्हता. हे असे दर्शविते की जेव्हा आपण आत्मे शरीराचे भावनेने व्यापलेले असतो तेव्हा आपला अहंकार आपल्याला आपल्या परमपित्याला, परमात्माला, सर्वशक्तिमानाला ओळखू देत नाही. डोके आपल्या अहंकाराचे प्रतिनिधित्व करते. म्हणून, शंकरजी बाल



गणेशाचे शिरच्छेदन करणे हे दर्शविते की परमात्मा आपला अहंकार नष्ट करतो आणि त्याच्या जागी ज्ञानाचे डोके ठेवतो. ज्ञान आपल्याला आपल्या सर्व अडथळ्यांचा नाश करण्याची शक्ती देते. अशाप्रकारे, श्री गणेशाचा जन्म आणि त्याचे गुण आपल्याला आपल्या जीवनातील अडथळ्यांचा नाश करणारे कसे बनायचे ते शिकवतात. त्यावेळी कार्यक्रमात आभार व्यक्त देवराम ढोले त्यांनी केले. रामदास गाढवे,मोकाते, सुभाष भाई ,पर्वती गाढवे, मीना मेमाने, सुमन ढोले, मनीषा मेहेत्रे. सोनाली मेमाणे,मंदा मेहेत्रे ,ढगे, माने,आरोही मेमाणे ,प्रणव मेहेत्रे, अक्षय चव्हाण,सुयोग भांड ,सार्थक मेहेत्रे प्रतीक, अभिजित तामखेडे हे उपस्थित होते.

# मिरा रोड राजा सार्वजनिक गणेशोत्सवा तर्फे विविध समजप्रबोधनाचे कार्यक्रमाचे आयोजन




**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०२, मिरा भाईंदर :** मिरा रोडचा महाराजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने यंदा आपल्या ३५व्या वर्षात प्रवेश करताना समाजप्रबोधनाचे ध्येय कायम राखले आहे. सन १९९१ पासून कार्यरत असलेले हे मंडळ केवळ धार्मिक कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता, दरवर्षी जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करत समाजातील ज्वलंत प्रश्नांवर प्रकाश टाकत असते. मंडळाचे अध्यक्ष मिलिंद मिराशी यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर गुन्ह्यांपासून बचाव, सेल्फ डिफेन्स, महिला सुरक्षा, दामिनी पथकाची कार्यपद्धती, रोबोटिक्स यांसारख्या विषयांवर माहितीपूर्ण कार्यक्रम राबवले गेले आहेत. यावर्षी ही मंडळाने महत्त्वपूर्ण सामाजिक विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी विविध क्षेत्रातील तज्ज्ञांना आमंत्रित केले होते. या कार्यक्रमांना मिरा-भाईंदर पोलिस उपायुक्त (झोन-१) राहुल चव्हाण, सायबर सेलचे निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, अमली पदार्थ विरोधी सेलचे संतोष घाडगे, भरोसा सेलच्या संध्या पवार, तसेच एचसीजी कॅन्सर रुग्णालयातील कॅन्सर तज्ज्ञ डॉ.यश माथूर यांची उपस्थिती लाभली.

# थोडक्यात

## पाटण येथे सकल मराठा समाजाचा आनंदोत्सव...
### छत्रपतींना अभिवादन, फटाक्यांची आतषबाजी, पेढे वाटून केला आनंद साजरा



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०२, पाटण (सातारा) :** मराठा आरक्षण संदर्भात मुंबई येथे मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला आलेल्या यशाचा विजयोत्सव महाराष्ट्रात सर्वत्र साजरा होत असताना पाटण तालुक्यात देखील सकल मराठा समाजाच्या वतीने हा आनंदोत्सव ठिकठिकाणी साजरा करण्यात आला. झेंडा चौक पाटण येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून फटाक्यांची आतिषबाजी करून एकमेकांना पेढे वाटून हा आनंद साजरा केला. मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांचे मुंबई येथे पाचव्या दिवशी चालू असलेले आंदोलनाची गंभीर दखल घेत सरकारने मराठा - कुणबी आरक्षण संदर्भात सकारात्मक भूमिका घेत मराठा समाजाच्या ८ पैकी ६ मागण्या मान्य केल्या. तसा शासन निर्णय देखील तात्काळ दिला. हा मराठ्यांचा ऐतिहासिक निर्णय झाला. मराठा समाजाच्या मागण्या मान्य झाल्याने मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनाच्या पाचव्या दिवशी आमरण उपोषण सोडले. याचा विजयोत्सव आनंद पाटण तालुक्यात ठिकठिकाणी मराठा बांधवांनी मोठ्या उत्साहात साजरा केला. पाटण शहरात झेंडा चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेश पुष्पहार अर्पण करून फटाक्यांची आतषबाजी करुन व एकमेकांना पेढे वाटून हा आनंदोत्सव साजरा केला.

## शिक्षक परिषद शिष्टमंडळाची आ.भोंगळे यांच्याशी भेट



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक तालुका शाखा राजुरा शिष्टमंडळाने दिनांक ०१ सप्टेंबर २०२५ रोजी राजुरा विधानसभा क्षेत्राचे आमदार देवराव भोंगळे यांची प्राथमिक शिक्षकांच्या समस्याबाबत विविध विषयावर निवेदनासह भेट घेऊन चर्चा करण्यात आली. आदिवासी उपाय योजना क्षेत्रासंबंधी महत्त्वपूर्ण विषय मांडण्यात आला. अनेक वाड्या, गुडे समाविष्ट नसल्याने कार्यरत कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ मिळावा, हा प्रश्न शासन दरबारी मांडावा अशी मागणी संघटनेतर्फे करण्यात आली. तसेच राजुरा तालुका हा आदिवासी बहुल तालुका असल्याने संपूर्ण तालुका आदिवासी उपाययोजना क्षेत्रात समाविष्ट करावा. केंद्रप्रमुख भरती तात्काळ करण्यात यावी. एकस्तर थकबाकीबाबत जिल्हा कोषागार कार्यालयाने नोंदवलेल्या आक्षेपांमुळे देयके परत करण्यात आली, याविषयी चर्चा करण्यात आली. तसेच याबाबत तात्काळ त्रुटी पूर्तता करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले.

सदर भेटीत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्राथमिक) किरण लांडे राजुरा तालुका अध्यक्ष, तालुका कार्यवाह विजय भोयर, जिल्हा कार्यकारी अध्यक्ष संजय लांडे, जिल्हा कार्यालयीन मंत्री दिलीपकुमार राठोड, अनिल मत्ते, प्रदीप पायघन, योगेश कोडापे, संतोष लांजेकर, गुणवंत कोटकर, रमेश मोहितकर, नामदेव जाधव, सुनोजी किगणे, अशोक मडावी, चरणदास मोते, सुरेंद्र दारवटकर, प्रकाश नंदिगमवार, बाळकृष्ण मसराम, ऋषी मेश्राम, साईबाबा इंदूरवार, कणिराम पवार, अशोक मडावी, सुरेश येन्नावार, रमेश मोहितकर, इरफान शेख, आशिष नवले तालुका पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## कामळज येथील मराठा बांधवांचा आझाद मैदानावर विजयी जल्लोष

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०२, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील मौजे कामळज येथील गावातुन मराठा बांधव दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी आझाद मैदान मुंबई येथे मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला सरसगट ओबासी मधून आरक्षण मिळावे. यासाठी आंदोलन सुरू केले होते. शिंदे सरकारने या पूर्वी वासी येथे सगे सोयऱ्यांना आरक्षण देण्याचे आश्वासन पाळावे. यासाठी दिनांक २७ ऑगस्ट २०२५ रोजी सराटी अंतराळी ते मुंबई महामोर्चा काढला. यासाठी पहिल्या दिवसांपासुन तालुक्यातील कामळज येथील शेकडो बांधव आपल्याला आरक्षण मिळावं, लेकरेबाळे भविष्य खुलवा,आपल्या जीवाची पर्वा न करता ऊन, वारा, पाऊस याची भिती न बाळगता मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनात सक्रीय सहभाग घेतला होता मनोज जरांगे पाटलांच्या आदेशाचे पालन करत टप्प्याटप्याने मराठा बांधवांची ये जा चालू आहे, जो पर्यत जरांगे पाटलांच्या मागण्या सरकार मान्य करणार नाही तोपर्यंत कामळज गावकरीही माघार घेणार नाहीत असा ठाम विश्वास बाळगुन आंदोलनात सहभागी झाले होते. दिनांक ०२ सप्टेंबर २०२५ रोजी सरकारने मनोज जरांगे पाटलांच्या मागण्या मान्य केल्या व अन्नत्याग आंदोलन मागे घेतले यावेळी उपस्थित कामळज मराठा मावळ्यांनी जल्लोष साजरा केला.

## मदनापूर तांड्यात तीज महोत्सवाचा विसर्जन सोहळा उत्साहात

**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.०२, किनवट (नांदेड) :** मदनापूर तांडा येथे दिनांक ०२ सप्टेंबर २०२५ रोजी तीज महोत्सवाचा विसर्जन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन प्रशांत भाऊ राठोड मित्र मंडळ तर्फे करण्यात आले होते. महोत्सवाची सुरुवात नायक शेषराव राठोड यांच्या घरासमोर संत सेवालाल महाराज यांच्या भोगाने करण्यात आली. पारंपरिक बंजारा लोकगीतांच्या सुरांनी आणि बंजारा वेशभूषेत सजलेल्या महिलांनी वातावरण भारावून टाकले. समाजातील ज्येष्ठ-तरुणांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून आला. या तीज महोत्सवाने बंजारा संस्कृतीतील परंपरा, लोकगीत आणि ऐक्याची भावना जपली. विसर्जन मिरवणुकीत तरुणाईचा उत्साह आणि महिलांची पारंपरिक नृत्यरचना विशेष आकर्षण ठरले.

